महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस मुंबई या संस्थेच्या आस्थापनेवरील जिल्हा संघटन आयुक्त, जिल्हा संघटक, सहाय्यक संघटन आयुक्त, जिल्हा स्काऊट संघटक, जिल्हा गाईड संघटक व जिल्हा स्काऊट/गाईड संघटक या ६ संवर्गातील पदनाम बदलून "जिल्हा संघटक (स्काऊट / गाईड)" हे नविन पदनाम करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : - भास्कागा- ३०१८/प्र.क्र.१५१/क्रीयुसे -३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ३० जुलै, २०१९

वाचा :- सह संचालक, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.एससीजी/ नामाभिदान एक/२०१८-१९/का-५/२७६०, दि. २३ जुलै २०१८.

प्रस्तावना : -

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस, मुंबई या संस्थेच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी १००% अनुदान देणे त्यामधील जिल्हा संघटन आयुक्त, जिल्हा संघटक, सहाय्यक संघटन आयुक्त, जिल्हा स्काऊट संघटक, जिल्हा गाईड संघटक व जिल्हा स्काऊट गाईड संघटक या ६ संवर्गातील पदांचे पदनाम बदलून त्याऐवजी एकच पदनाम करण्याची बाब सदर नस्तीवर विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस, मुंबई या संस्थेच्या आस्थापनेवर जिल्हा संघटन आयुक्त, जिल्हा संघटक, सहाय्यक संघटन आयुक्त, जिल्हा स्काऊट संघटक, जिल्हा गाईड संघटक व जिल्हा स्काऊट / गाईड संघटक या ६ संवर्गात एकूण ७४ पदे मंजूर आहेत. सदर संवर्गास वेतन बँड रु.५२००-२०२०० आणि ग्रेड वेतन रु.२८००/- अशी वेतनश्रेणी मंजूर आहे. तसेच या संवर्गातील पदांची कर्तव्य व जबाबदाऱ्या देखील समान आहेत. त्यांना संपूर्ण जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना भेटी देणे, शिक्षकांना स्काऊट व गाईडबद्दल मार्गदर्शन करणे, जिल्हा / राज्य / राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमासाठी जिल्हास्तरावर पूर्व तयारी करुन घेणे तसेच राज्य व राष्ट्रीय कार्यालयाने ठरवून दिलेले उद्दीष्ट पूर्ण करावे लागते. पदनामामध्ये एकसूत्रीपणा यावा याकरिता (१) जिल्हा संघटन आयुक्त, (२)जिल्हा संघटक, (३) सहाय्यक संघटन आयुक्त, (४) जिल्हा स्काऊट संघटक, (५) जिल्हा गाईड संघटक व (६) जिल्हा स्काऊट / गाईड संघटक या ६ संवर्गाचे पदनाम बदलून त्याऐवजी **"जिल्हा संघटक (स्काऊट / गाईड)"** हे नविन पदनाम संबोधण्यास शासन मान्यता देत आहे. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस, मुंबई या संस्थेने राज्य कार्यकारी समितीत आवश्यक तो ठराव मंजूर करावा व तसे या विभागास कळवावे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१२४३२७५०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.08.02 12:53:33 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. राज्य मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस, मुंबई
४. राज्य चिटणीस, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस, मुंबई
५. सर्व विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा (क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत)
६. मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (क्रीडा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. सर्व सह सचिव / उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय
९. वित्त विभाग सेवा-५, मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती (क्रीयुसे-३).